(339)

पहा- शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्रमांक-एलएनडी/१०७१/१८३७३ -३६अ-दोन दिनांक ९.९.१९७१

२.शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्रमांक जमीन-१०९५/७१३/प्रक्र-५९/ज-१ दिनांक २८ जून १९९९

३.उपसंचालक व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक मविका/प्रशि/क-१/९५-९६/५८७२ दिनांक २७/२/९६

४.उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र क्रमांक ९८/एलएनडी/२० दिनांक १८/२/९९, १५/३/२००१,२०/८/२००१

क्र.९६/आरबी/२/एलएनडी/१/६७३
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक - ४/२/२००२

## आ दे श

उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांनी त्यांचे संदर्भिय पत्र क्रमांक ४ अनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था धारूरची इमारत बांधकामासाठी धारूर येथील गायरान जमीन स.न. ३७८ मधून ५ एकर जमीन उपसंचालक व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद यांना देणे बाबत प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २२ अनुसार व शासनाच्या संदर्भ क्रमांक १ व २ मधील पत्रकानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकारी बीड हे धारूर जिल्हा बीड येथील गायरान जमीन स.न.३७८ मधून ५ एकर जमीन उपसंचालक व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था धारूरच्या इमारतीचे बांधकामासाठी खालील अटीवर वर्ग करण्यास आदेशित करीत आहे.

१. ज्या कारणासाठी जमिनीचे विनियोजन करण्यात आले आहे तिचा वापर त्याच कारणासाठी केला पाहिजे. त्या जमिनीचे हस्तांतरण विक्री किंवा लीजवर खाजगी व्यक्तिस किंवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

२. उपरोक्त जमिनीची त्या खात्यास जेव्हा आवशक्ता नसेल तेव्हा ती जमीन महसूल खात्यास (शासनास) परत करावी लागेल व त्या जमिनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमानुसार करण्यात येईल.

जिल्हाधिकारी बीड

प्रतिलिपी -

१. मा.सचिव,महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
३. उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांना माहितीस्तव.
४. उपसंचालक व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद
५. तहसीलदार धारूर यांना देवून कळविण्यात येते की, तालुका निरिक्षक भूमी अभिलेख धारूर यांच्याकडून या जमिनीची मोजणी करून घेउन मोजणी नकाशा प्राप्त करून घेवून जमिनीचा ताबा उपसंचालक व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद यांना देण्यात यावा व कब्जेपावती व पंचनाम्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.
६. तालूका निरिक्षक भूमी अभिलेख धारूर यांना देवून कळविण्यात येते की, सोबतच्या स्थळदर्शक नकाशानुसार जमिनीची मोजणी करून मोजणी नकाश्याची प्रत तहसीलदार धारूर यांना व या कार्यालयास सादर करावी.
७. प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था धारूर यांना माहितीस्तव.

जिल्हाधिकारी बीड करिता

ISSUED
7 ... ... 6/2/02
DESPATCH CLERK,
COLLECTORATE, BEED

जिल्हाधिकारी काय

(जमाबंदी-१ शा

फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

संदर्भ:-१. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-१०/२००५/प्रक्र.३८/ज-१/दिनांक ७/३/२००६.
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपक्रएलएनडी-१०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० ज-१दिनांक ५/४/१९९१.
३. कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर याचे पत्र दिनांक २८/०७/२०१४
४. उप विभागीय अधिकारी, माजलगांव यांचे पत्र क्र २०१५/उविअ/जमा/कावि-दिनांक २५/०३/२०१५
५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि. २७/७/२०११.
६. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि. १७/१०/२०११.
७. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्रक्र५३/ज-१दि.१२/७/२०११.

क्रमांक २०१५/मशाका/जमा-१/प्र.क्र.१५/कावी/
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक :- १८/०५/२०१५

## आदेश

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांनी संदर्भीय क्र. ३ अन्वये मौजे कारी ता. धारुर जि.बीड येथे ३३ के.व्ही उपकेंद्रासाठी मौजे. कारी ता. धारुर जि.बीड येथील शासकीय गायरान जमीन स.न. ११७ मधून ०.८० आर जमीनीची मागणी केली आहे. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, माजलगांव यांचे पत्र क्र २०१५/उविअ/जमा/कावि-दिनांक २५/०३/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन जमीन मंजूर करणेस शिफारस केली आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २०,३१नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५ ला संदर्भ क्र.५,६,७,८ ला आधिन राहून व उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीतस अधीन राहून अन्वये मौजे कारी ता. धारुर जि.बीड ३३ के.व्ही उपकेंद्र अन्वये मौजे कारी ता. धारुर जि.बीड येथील शासकीय गायरान जमीन स.न. ०८ मधून ०.८० आर जमीन कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांना आदेशातील अटी व शर्तीस आधीन राहून खालील चतु:सिमा प्रमाणे आगावू ताबा देण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

**चतु:सिमा**

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | :- | लागून स. नं. ११६ व १२९ |
| पश्चिमेस | :- | लागून स. नं. १०४ |
| दक्षिणेस | :- | धारुर ते तेलगांव रोड |
| उत्तरेस | :- | लागून स. नं. ११६ व १०४ |

**अटी/ शर्ती**

१. जमीनीचा आगावू ताबा दिल्याच्या दिनांकापासून जमीनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी म.रा.वि.वि.कंपनीची असेल व जमीनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसेल तर सदरील जमीन शासनाकडे कोणतीही नुकसान भरपाई न मागता परत करण्याची जबाबदारी म.रा. वि कंपनीवर राहील.

२. शासन परिपत्रक क्र. एलएनडी-१०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० ज-१ दिनांक ५/४/१९९१.अन्वये भागाधिकारी मूल्य ठरविणे/शर्ती व अटी निश्चीत करणे इतर बाबी आगावू ताबा दिल्यानंतर पूर्ण करावयाच्या असल्यामूळे शासन जे भागाधिकार मूल्य निश्चित करेल ते व्याजासह भरण्याचे व जमीन प्रदानाबाबत ज्या अटी व शर्ती असतील त्या तंतोतंत पाळव्या लागतील.

३. सन २०१५ चे भोगाधिकार मूल्याची जी राक्कम देय ठरेल ती रक्कम जमीनीचा आगावू ताबा दिलेल्या दिनांकापासून शासनाचे स्थाई आदेशाप्रमाणे ठरवून दिलेल्या दराने होणा-या व्याजासह शासनाकडे विनाविलंब भरावी.

४. शासकीय जमीनीचे भोगाधिकार मूल्य ठरवणे, शर्ती व अटी निश्चित करणे इत्यादी बाबी आगाऊ ताबा दिल्यानंतर पूर्ण करावयाच्या असल्यामुळे शासन जे भागाधिकार मूल्य निश्चित करील ते व्याजासह भरण्याचे व मान्य असल्या बददल महाराष्ट्र राज्य विद्यूत कंपनीस स्टॅम्प पेपरवर लेखी कबुलायत देणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

(जमाबंदी-१ शाखा)

५. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार [illegible] येत असून सदरील प्रस्तावात काही कागदपत्र अपूर्ण असल्यास सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांची राहील.

६. उपरोक्त जमीनीची कंपनीस आवश्यकता नसेल तेव्हा ती जमीन महसूल खात्यास परत करावी लागेल व त्या जमीनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमानुसार करण्यात येईल.

७. मंजूर केलेल्या जमीनी पैकी १० टक्के क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे कंपनीस बंधनकारकराहील व या अटीचे उल्लंघण केल्यास शर्तभंग समजून कार्यवाही केली जाईल.

८. सदर जमीन दिलेल्या प्रयोजनार्थ एक वर्षाच्या आंत उपयोगात आणावी .अन्यथा जमीन परत घेण्यात येईल

९. कंपनी सदर जमीन भोगवटदार वर्ग-२ म्हणून धारण करेल मंजूर आदेशातील अटीचा भंग झाल्यास सदर जमीन परत बांधकामासह त्यावरील सर्व बाबीसह सरकार जमा करण्यास पात्र राहील व कंपनीस कोणताही मोबदला मागण्याचा हक्क राहणार नाही.

१०. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यात आले आहे त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहिजे. त्या जमीनीचे हस्तांतरण ,विक्री,लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी बीड याचे पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

जिल्हाधिकारी बीड

प्रतिलिपी,

१. मा. अपर मुख्य सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहीतीस्त सविनय सादर.
३ कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर .
४. उप विभागीय अधिकारी, माजलगांव
५. अधिक्षक भूमी अभिलेख बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
६. तहसिलदार धारूर यांना देवून कळविण्यात येते की उप अधिक्षक भूमी अभिलेख धारूर याचे कडील सदर जमीनीच्या मोजणी प्रमाणे जमीनीचा ताबा कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांना देवून कब्जे पावती व पंचनाम्यासह अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
७. उप अधिक्षक भूमी अभिलेख, धारूर

सही/-xxx

जिल्हाधिकारी बीड करिता

1) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.जमीन41/2000/प्र.क्र.170
दि. 15/3/2007.

2). मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे प.क्र.1999/महाका-2/आ
दि. 10/4/2007.

3). उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे प.क्र.98/एलएनडी/12 8.व
दि.5/2/1999.

4). महाराष्ट्र जमीन महसूल ( स.ज. वि. ) नियम 1971 मधील नियम 5 व 6 .

5). शासन निर्णय क्र.जमीन 10/2002/प्र.क्र.387/ज-1. दिनांक 29/5/2006.

क्र.98/आरबी/2/एलएनडी/1/1303.
**जिल्हाधिकारी कार्यालय बीड.**
दिनांक :- 20/4/2007.

<u>आ दे श.</u>

उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांनी त्यांचे प.क्र.98/एलएनडी/12. दि.5/2/1999 नुसार मौजे धारुर ता.धारुर जिल्हा बीड येथील शासकीय जमीन स.नं.377 मधील क्रिडा प्रशिक्षण केंद्रासाठी आरक्षीत असलेली 1 हे.60 आर जमीन धारुर येथे क्रिडा प्रशिक्षण केंद्रासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी बीड यांना देण्या बाबत प्रस्ताव या कार्यालयास सादर केला.

त्या अर्थी शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.जमीन 41/2000/प्र.क्र.170/ज-7. दि.15/3/2007नुसार , मौजे ता.धारुर जि.बीड येथील स.नं.377 मधुन क्रिडा प्रशिक्षण केंद्रासाठी आरक्षीत असलेली 1 हे.60 आर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमिनीची विल्हेवाट ) नियम ,1971 च्या नियम 5 व 6 अन्वये तसेच सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रिडा व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.राक्रिधो2002/प्रक्र121/क्रियुसे1,दि.24/2/2003मधील तरतुदीनुसार भोगाधिकार मुल्यरहित व सारामाफीने व नेहमीच्या अटी व शर्तीवर तसेच खालील अतिरिक्त अटीवर तालुका क्रिडा संकुलाचे उभारणीसाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभागास हस्तांतरित करण्यांस शासनाने मान्यता दिल्यावरुन सदरील जमीन जिल्हा क्रिडा अधिकारी बीड यांना हस्तांतरित करणेस आदेशीत करित आहे.

<u>अटी</u> :-

1. तालुका क्रिडा संकुलासाठी मंजूर करण्यांत आलेल्या जमिनीचा वापर क्रिडा संकूल उभारणीसाठी करण्यांत यावा.तसेच शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय जमिनीचा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.
2. जमिनीचे संरक्षण करणे तथा व्यवस्थापन करण्याची संपूर्ण जबाबदारी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाची राहील.
3. मंजूर जमीन शासनाच्या परवानगी शिवाय कोणालाही तारण ठेवता येणार नाही किंवा विक्री करता येणार नाही.
4. उपरोक्त जमीनीची त्या खात्यास आवश्यकता नसेल तेंव्हा ती जमीन महसूल खात्यास ( शासनास ) परत करावी लागेल व त्या जमीनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व त्या खालील नियमानुसार करण्यांत येईल.

..स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी बीड**

प्रतिलिपी :- 1).मा.सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई 32 यांना माहीतीस्तव सादर.
2).मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहीतीस्तव सादर.
3).उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

(कृपया मागे पहा)